




# दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०३ ● अंक : ०१६ ● पुणे ● शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




पुणे महानगरपालिका निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष 3



वारजे ते वनाज मेट्रो फीडर बस सेवा सुरू 4

## ठळक बातम्या

### १० वर्षांनंतर मसापची निवडणूक?

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र साहित्य परिषदेची बहुचर्चित निवडणूक अखेर लवकरच होण्याची शक्यता असून, शनिवारी (दि. 27) होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या 2026 ते 2031 या पंचवार्षिक निवडणुकीबाबत प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. सभेने मान्यता दिल्यानंतर दहा वर्षांनंतर मसापच्या निवडणुका होणार आहेत. परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी दुपारी तीन वाजता टिळक रस्त्यावरील मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणार आहे. परिषदेच्या कार्यकारिणीची मुदतवाढ 31 मार्च रोजी संपुष्टात येत असल्याने आता लोकशाही मार्गाने परिषदेची निवडणूक घेण्याचा निर्णय कार्यकारिणीने घेतला आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडणुकीचा प्रस्ताव मांडून त्यास सभेची मान्यता घेण्यात येणार आहे. त्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर केला जाणार असल्याची शक्यता आहे.

### १२०० बस येणार, पण पार्किंगचा पेच!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत बस डेपो आणि बसस्थानकांसाठी आरक्षित असलेल्या जागा तातडीने आम्हाला द्या, अशा मागणीचे पत्र पीएमपी प्रशासनाने दोन्ही महापालिकांसह पीएमआरडीएला दिले आहे. तसेच, प्रवाशांची वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीने आणखी आरक्षित नसलेल्या मात्र, पीएमपी डेपो, बसस्थानक प्रवाशांसाठी उपलब्ध करता येतील, अशा जागाही मिळाव्यात, अशी मागणी पीएमपीकडून करण्यात आली आहे. पीएमपीच्या ताफ्यात लवकरच नव्या 1200 बस दाखल होणार आहेत. त्यासाठी पीएमपी प्रशासनाला 8 ते 10 नवे डेपो, बस स्थानकांची आवश्यकता भासणार आहे. त्यापार्श्वभूमीवर पीएमसी, पीसीएमसी आणि पीएमआरडीएच्या हद्दीतीलआरक्षित जागांची पीएमपी प्रशासनाकडून चाचपणी युद्धपातळीवर सुरू आहे. त्याकरिता पीएमपीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची धावपळ सुरू आहे. आणि जागा मागणीसाठी पत्रव्यवहार सुरू आहेत. सध्या पीएमपीच्या सध्या 2,001 बस आहेत, त्यापैकी 1 हजार 812 बस प्रत्यक्ष मार्गावर असतात. त्यातही बेकडाऊनमुळे यातीलही 50 ते 70 बस दररोज बंद असतात. त्यामुळे पुणेकरांना बसगाड्यांची संख्या अपुरी पडत आहे.

### खासगी वाहनांच्या बाजूने कल?

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील वाहतूककोंडीला अतिक्रमणे, गरजेपेक्षा रुंद पादचारी मार्ग, सायकल मार्ग, खड्डे, पार्किंग आदी जबाबदार असल्याचे पालिकेने सादर केलेल्या एका अहवालात म्हटले आहे. हा अहवालच अत्यंत त्रोटक आणि कालबाह्य विचारांना खतपाणी घालणारा असून, तो अशाश्वत, अवैज्ञानिक आणि दिशाभूल करणारा असल्याचा आरोप नागरी संस्था, वाहतूक व पर्यावरण कार्यकर्त्यांनी करत रोष व्यक्त केला.

# भारताकडून 'लंकादहन'



**दुबई (दै. आरंभ पर्व)**

रोमांचक सुपर ओव्हरपर्यंत रंगलेल्या शेवटच्या सुपर-4 सामन्यात भारताने लंकेला चीत करत प्रतिस्पर्ध्यांचा संघर्ष संपुष्टात आणला. प्रारंभी 20 षटकांची लढत टाय झाल्यानंतर सुपर ओव्हरचा अवलंब करण्यात आला. यात लंकेचे दोघे फलंदाज दोनच धावांवर बाद झाले, तर प्रत्युत्तरात सूर्यकुमारने पहिल्याच चेंडूवर 3 धावा वसूल करत लंकेचे सामन्यातील आव्हान संपुष्टात आणले.

प्रारंभी, 20 षटकांच्या लढतीत भारताने 5 बाद 202 धावांचा डोंगर रचल्यानंतर लंकेनेदेखील 20 षटकांत 5 बाद 202 धावाच केल्या आणि हा सामना रोमांचकरीत्या टाय केला होता.

विजयासाठी 203 धावांचे आव्हान असताना श्रीलंकेने षटकामागे 10 च्या सरासरीने फटकेबाजी सुरू ठेवत भारतीय गोलंदाजांवर बरेच दडपण निर्माण केले. पथूम निसांका (58 चेंडूंत 107) व कुशल परेराचा वाटा यात सिंहाचा राहिला. कुशल परेरा 32 चेंडूंत 58 धावांवर बाद झाला असला, तरी 181.25 च्या स्ट्राईक रेटने त्याने केलेली फटकेबाजी लक्षवेधी ठरली. निसांकानेही जवळपास प्रत्येक चेंडूवर तुटून पडण्याचा सिलसिला कायम ठेवत आगेकूच सुरूच ठेवली. या लढतीत कुशल मेंडिस गोल्डन डकचा मानकरी ठरला, तर परेराला वरुणने सॅमसनकरवी यष्टीचीत केले.

तत्पूर्वी, अभिषेक शर्मा (61), तिलक वर्मा (49) व संजू सॅमसन (39) यांच्या फटकेबाजीमुळे भारताने निर्धारित 20 षटकांत 5 बाद 202 धावांचा डोंगर उभारला. या स्पर्धेत कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या ठरली.

अभिषेकने केवळ 31 चेंडूंत 61 धावा फटकावताना 8 चौकार 2 उत्तुंग षटकार फटकावले. या स्पर्धेत अभिषेकने पॉवरप्लेमध्ये गोलंदाजांवर सातत्याने आक्रमणे केली असून, येथे त्याने अर्धशतकांची हॅट्ट्रिकही साजरी केली.

### शेवटच्या २ षटकांत काय घडले?

लंकेला या लढतीत शेवटच्या 2 षटकांत 23 धावांची आवश्यकता होती. यापैकी अर्शदीपच्या डावातील 19 व्या षटकात 11 धावा वसूल केल्या गेल्या आणि यासह शेवटच्या षटकात 12 धावांची गरज, असे नवे समीकरण होते. हर्षितच्या शेवटच्या षटकात निसांका पहिल्याच चेंडूवर बाद झाला होता. मात्र, शेवटच्या चार चेंडूंत लंकेने 11 धावा वसूल केल्याने हा सामना टाय झाला होता. षटकातील शेवटच्या चेंडूवर 3 धावांची गरज असताना शनाकाने 2 धावा घेत सामन्यात लंकेला बरोबरी मिळवून दिली.

### तरीही निसांका लढत राहिला..!

निर्धारित 20 षटकांच्या लढतीत विजयासाठी 203 धावांचे आव्हान असताना कुशल मेंडिस (0), असलंका (5), कमिंदू (3) स्वस्तात बाद झाले. मात्र, एका बाजूने सातत्याने गडी बाद होत असताना निसांकाने 107 धावा फटकावत संघर्ष कायम ठेवला होता. निसांका अखेर शेवटच्या षटकातील पहिल्या चेंडूवर बाद झाला.

### शुभमन आणि सूर्यकुमार स्वस्तात बाद

शुभमन गिल आणि सूर्यकुमार यादव स्वस्तात बाद झाले असतानाही, शुक्रवारी त्याने आपल्या खेळीत आठ चौकार आणि दोन षटकार लगावले. श्रीलंकेचा कर्णधार चरिथ असलंकाच्या चेंडूवर तो डीप मिड-विकेट बाऊंड्रीवर झेल देऊन बाद झाला. गिलला (4) तिक्षणाने टाकलेला चेंडू हळू आल्याने त्याचा बॅटचा लीडिंग एज लागला आणि तिक्षणानने त्याचा झेल घेतला. फॉर्मसाठी झगडत असलेला कर्णधार सूर्यकुमार यादवने (12) स्वीप शॉट मारून अडचणीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला; पण वानिंदू हसरंगाने त्याला पायचीत केले होते.

### फायनलपूर्वी जणू 'वेकअप कॉल'!

अंतिम क्षणी लंकेला विजयाने हुलकावणी दिली असली, तरी त्यांनी टाय संपादन करत भारताला निर्णायक फायनलपूर्वी एका अर्थाने वेकअप कॉलच दिला आहे. पाकिस्तानविरुद्ध निर्णायक फायनलमध्ये कोणत्याही आघाडीवर गाफिल राहून चालणार नाही, हेच या लढतीतून अधोरेखित झाले.

## लाच मागणाऱ्या ३ तलाठ्यांवर गुन्हा

● **सांगरुण गाव, बहुल गाव, खडकवाडी गावच्या महिला तलाठ्यांवर गुन्हा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरालगतच्या प्रस्तावित रिंग रोडमध्ये अधिहित झालेल्या जमिनीच्या सातबारा तसेच 8-अ उताराच्या प्रतीसाठी लाच मागणाऱ्या तीन गावांच्या तीन महिला तलाठ्यांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दिलेल्या तक्रारीवरून खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवेली तहसीलदार यांच्या कार्यालयासमोर गुरुवारी (दि. 25) ही कारवाई करण्यात आली आहे. हवेली तालुक्यातील सांगरठी गावच्या तलाठी प्रेरणा बबन पारधी (30, रा. जी सोसायटी, गुलमोहर पार्कजवळ, पाषाण), बहुली गावच्या तलाठी दीपाली दिलीप पासलकर (29, रा. स्वामी समर्थनगर, काकडेनगर, कोंढवा) आणि खडकवाडी गावच्या तलाठी शारदादेवी पुरुषोत्तम पाटील (40, रा. कृष्णकुंज सोसायटी, मोरे वस्ती, मांजरी) अशी गुन्हा दाखल झालेल्या तीन तलाठ्यांची नावे आहेत.

## सदनिकाधारकांना लवकरच मिळणार 'व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड'

**प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


गृहप्रकल्पातील प्रत्येक सदनिकाधारकाला जमीनमालकीचा पुरावा देण्यासाठी व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्याचे जाहीर केले होते. आता राज्य शासनाने यात सुधारणा करीत सातबारा उताऱ्यावरील इमारतींमधील प्रत्येक सदनिकाधारकाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा सूचना महसूल विभागाने भूमिअभिलेख विभागाला दिल्या आहेत. त्यानुसार भूमिअभिलेख विभागाकडून सुधारित प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू असून, लवकरच हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती भूमिअभिलेख विभागाकडून देण्यात आली. या प्रस्तावास मान्यता मिळाल्यास सातबारा उतारा असलेल्या किंवा प्रॉपर्टी कार्ड असलेल्या सर्व सदनिकाधारकांना वैयक्तिक मालकी हक्काचा कायदेशीर पुरावा मिळणार आहे.




राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात प्रत्येक सदनिकाधारकांना व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड लवकरच देणार असल्याचे जाहीर केले. तसेच या योजनेचा आणखी विस्तार करत प्रॉपर्टी कार्ड असलेल्या इमारतींबरोबरच सातबारा उतारा असलेल्या इमारतींमधील प्रत्येक सदनिकाधारकांनासुद्धा प्रॉपर्टी कार्ड देणार असल्याचे सांगितले. सदनिकांच्या बाबतीत मालकी हक्क सिद्ध करण्यासाठी महापालिकेकडे कर भरल्याची पावती आणि खरेदी-विक्री करारनामा एवढाच दस्त उपलब्ध असतो. ज्या जागेवर इमारत उभारली आहे. त्या जागेच्या प्रॉपर्टी कार्डवर मात्र गृहनिर्माण सोसायटी अथवा अपार्टमेंट नोंद असते. तसेच सर्व सदनिकाधारकांची एकत्रित नावे त्यावर असतात. या सर्व पार्श्वभूमीवर व्हर्टिकल इमारतींना प्रॉपर्टीकार्ड देण्याचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाकडून 2019 मध्ये तयार करण्यात आला.









# नको हे विरोधक



निम्म्या महाराष्ट्राला अतिवृष्टीने उद्ध्वस्त केल्यानंतर हवामान विभागाने कालच आणखी किमान दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज दिला आहे. ५ ऑक्टोबरनंतरच मान्सून परतीला निघेल, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. पावसाने या आठवड्यात महाराष्ट्रात उडवलेला हाहाकार ज्यांनी प्रत्यक्ष बघितला असेल किंवा ज्यांनी त्याची दृश्य टीव्हीवर पाहिली असतील, ते हवामान खात्याचा नवा अंदाज पाहून खोल काळजीत बुडाल्याशिवाय राहणार नाहीत! निसर्गाने उभी केलेली संकटं अशी असतात, की ती रोखता येत नाहीत. त्यांच्यापासून काही प्रमाणात आपला बचाव करता येतो. पावसाचं येणं, न येणं पूर्णपणे त्याच्या लहरीवर असतं. ना आग्रहाने तो येतो, ना थांब म्हटल्याने तो थांबतो. त्याची कृपा (किंवा अवकृपा) स्वीकारण्याशिवाय आपल्या हाती काही नसतं. विज्ञानाच्या प्रगतीने अशा संकटांच्या काही आगाऊ सूचना मिळाल्याच, तर मनाची तयारी करायला थोडा वेळ मिळतो; नुकसान रोखण्यासाठी आवश्यक ती काळजीही काही प्रमाणात घेता येते. पण, शेतात उभ्या पिकाचं, फळबागांचं काय करणार? पिकं काढणीला आली असतील, तर घाईने कापणी करता येते. पिकली फळं उतरवून ठेवता येतात. पण, हे सगळे प्रयत्न आपलं नुकसान त्यातल्या त्यात कमी करण्याचे असतात. त्यापेक्षा अधिक काही आपल्या हाती नसतं. म्हणूनच पावसाचे बदलणारे पॅटर्न समजावून घेऊन त्यानुसार आपण आपली शेती, जगणं मापणं आवश्यक असतं. महाराष्ट्रातच काय, पूर्ण देशातच अशी वेळ आली आहे. या क्षेत्रातील आपली संशोधनं आपल्याला त्या दिशेने न्यावी लागणार आहेत.

परतीच्या पावसाने दणका देण्याचं हे काही पहिलं वर्ष नाही. यापूर्वी आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेशच्या पूर्व भागात परतीच्या पावसाने महापूर यायचे. गावं जलमय व्हायची. पण, या वर्षीचं चित्र अगदी वेगळं आहे. जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशाबरोबरच गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब या राज्यांतही परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. देशाचं धान्याचं कोठार म्हणून जी राज्यं गणली जातात, त्या पंजाब, हरियाणात झालेली अतिवृष्टी आणि आलेले पूर देशाला अन्नधान्याच्या बाबतीत मोठा फटका दिल्याशिवाय राहणार नाहीत. अन्यत्र झालेल्या अतिवृष्टीनेही डाळी, कडधान्य, सोयाबीन, कापसाच्या पिकाचं मोठं नुकसान झालं आहे. देशाचा शेती उत्पादनाचा मूळ हिशोबच यावर्षी पूर्ण बिघडून जाणार आहे. हे नुकसान नक्कीच कमी नसेल. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, दिवाळीनंतर याबाबतचे अंदाज समोर येतील. बदललेल्या निसर्गचक्राने भारतीय शेतीचं; आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेचं किती नुकसान केलं आहे, ते त्यावेळी कळेल. पूर्वी वारावादळं होत नव्हती, ढगफुटी होत नव्हत्या असं नाही. त्याचं प्रमाण अपवादात्मक असे. आता ते सर्रास होऊ लागलं आहे. मान्सूनचं वेळेपूर्वी आगमन, कमी वेळात अचानक जास्त कोसळणं आणि त्यानंतर मुक्काम लांबवणं या पूर्ण चक्राचाच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. हे बदललेलं चक्र शेती आणि शेतकऱ्याच्या मुळावर आलंच आहे. पण, देशाच्या पायाभूत सुविधा यंत्रणांवरही त्याचा परिणाम होतो आहे. रेल्वे, रस्ते इमारती, मोठे पूल, वीज वाहिन्यांचं जाळं, दूरसंचार नेटवर्क हा पाऊस उद्ध्वस्त करतो आहे. शेती आणि पर्यावरणीय नुकसानीला याची जोड दिली, तर बदललेल्या पाऊसमानाचा आपल्या अर्थव्यवस्थेला किती मोठा फटका बसतो आहे, हे लक्षात येईल. अशा नुकसानीचा विचार करताना कधीच मानवी भावभावना, आकांक्षा, स्वप्नं, नातेसंबंधावर कसं पाणी फिरतं, याची मोजदाद होऊ शकत नाही. ती करता आली, तर हे नुकसान मोजण्याच्या पलीकडचं असेल! या सगळ्या प्रतिपादनाचा मथितार्थ एवढाच, की पावसाचा हा बदललेला स्वभाव पाहून त्यानुसार आपल्याला तातडीने उपाययोजना कराव्या लागतील. कृषी शास्त्रज्ञांवर याची सर्वात मोठी जबाबदारी असेल. जोडीला हवामानशास्त्रज्ञ, अभियंते, नगर रचनाकार आणि व्यवस्थापन तज्ज्ञांची जोडही लागेलच. अचानक येणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यांचा निचरा होण्यासाठी काँक्रिटीकरणाच्या वेडाला आवर घालणं, जुन्या ओढ्या-नाल्यांना पुनरुज्जिवीत करणं, नद्यांभोवतीची अतिक्रमणं दूर करणं, नद्यांची पात्र रुंद आणि खोल करणं, तलाव-धरणातले गाळ काढणं या उपाययोजना प्राधान्यक्रमाने आणि कठोरपणे अमलात आणाव्या लागतील. अन्यथा, दरवर्षी संपत्तीची, मानवी कर्तृत्वाची मोठी हानी होत राहील. त्याच्या नुकसान भरपाईसाठी पैशाच्या राशी ओततच राहाव्या लागतील. महाराष्ट्रात अतिवृष्टी झालेल्या अनेक गावांचा संपर्क पाऊस थांबून दोन दिवस झाले, तरी अद्याप शक्य नाही. साचलेलं पाणी आणि चिखल यामुळे तिथपर्यंत मदत घेऊन जाणंही सोपं नाही. तरीही मंगळवारी मंत्रिमंडळाची बैठक झाल्या झाल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह संपूर्ण मंत्रिमंडळ महाराष्ट्राच्या सर्व अतिवृष्टीग्रस्त भागात पोहोचलं होतं, ही अभिनंदनीय बाब आहे. त्याबाबत समाधान व्यक्त करायचं सोडून विरोधी पक्षांनी पुन्हा तीच ठरलेली टीका सुरू केली आहे.

लोकांनी ज्यांना विरोधी बाजूला ढकललं, त्यांनी सतत अवास्तव मागण्याच करत राहिलं पाहिजे, संकटात सापडलेल्यांच्या दुःखावर फुंकर घालण्याऐवजी त्यांची मनःशांती बिघडवली पाहिजे असा नियम नाही.

पण, एकदा बेजबाबदारपणा अंगी भिनला, की तारतम्याशी संबंध सुटतो. महाराष्ट्रातल्या विरोधी पक्षांची भूमिका आणि भाषा पाहता त्याचाच प्रत्यय येतो आहे. हवामान खात्याचा पुढचा अंदाज तर त्यांच्या गावीही दिसत नाही. निम्मा महाराष्ट्र प्रचंड अडचणीत असताना आणि आणखी संकटाचे ढग डोक्यावर जमा होत असताना तरी त्यांनी स्वतःला आवरलं पाहिजे.

## वडगावमध्ये कांतीरामअण्णा जाधव परिवारातर्फे ४५वा बैलपोळा उत्साहात साजरा

### शहरात जाऊनही गावपण जपणारे – वडगावचे जाधव परिवार : बैलपोळ्याची ही परंपरा कायम राखली जाणार ; पै. युवराज जाधव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बैलपोळा हा शेतकरी वर्गाच्या जीवनातील आनंदाचा, परंपरेचा आणि उत्साहाचा सण आहे. शहराकडे स्थलांतर झाले तरी गावची ओळख, संस्कार आणि परंपरा जपणारा वडगाव येथील प्रगतशील शेतकरी कांतीराम अण्णा जाधव व त्यांचा परिवार मागील सलग ४५ वर्षांपासून हा उत्सव अविरत साजरा करत आहे. यावर्षीही जाधव नगर व जाधव वाड्यात बैल सजवून, त्यांची पूजा करून ढोल-ताशांच्या गजरात पोळा साजरा करण्यात आला. पारंपरिक वाद्यवृंद, चाल-वादन आणि गावठी संगीताच्या तालावर वातावरण दुमदुमून गेले. यावेळी पै. युवराज जाधव, केदार नाना जाधव, ऋषिकेश जाधव आणि चैतन्य जाधव बंधूंनी उत्सवाचे नेतृत्व करत परंपरेची धुरा सांभाळली. बैलपोळ्याच्या निमित्ताने जाधवनगर येथे सर्व पाहुण्यांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नागरिक, नातेवाईक आणि मान्यवरांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून उत्सव अधिकच भव्य केला.

जरी वडगाव पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाले असले तरी, “शहरात राहूनही गाव विसरलेलो नाही” हा भाव जपणारा जाधव परिवार आजही आपल्या परंपरा जोपासत आहे. भविष्यातही अशाच उत्साहात बैलपोळा साजरा करून परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार कुटुंबीयांनी व्यक्त केला.

## यशील श्री कोचिंग क्लासेसचा गौरव



**निलंगा(दै. आरंभ पर्व)**

निलंगा तालुक्यातील यशील श्री कोचिंग क्लासेस यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेला राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

गेल्या २५ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या संस्थेने कोरोनाकाळातही शिक्षणाची अखंड परंपरा कायम ठेवली. लॉकडाऊनमुळे शाळा–कॉलेज बंद असताना ग्रामीण भागातील तसेच वाडी-वस्त्यांतील विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले. स्पर्धा परीक्षा, इंजिनिअरिंग, मेडिकल, पोलीस भरती यासह विविध क्षेत्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना यश मिळवून देण्यात या क्लासेसचा मोठा वाटा आहे. या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेत नुकतेच महाराष्ट्र उद्योजक पुरस्कार २०२५ तसेच ऑनलाईन एज्युकेशन इन महाराष्ट्र हा पुरस्कार देऊन यशील श्री कोचिंग क्लासेसचा सन्मान करण्यात आला.

## भारतीय जनता पार्टी सरचिटणीसपदी हेमेंद्र जोशी यांची निवड



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील धायरी-शिवणे मंडल (दक्षिण) ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, भारतीय जनता पार्टीचे अनुभवी, प्रख्यात हिंदुत्ववादी विचारसरणीचे नेते व संघटन कौशल्यासाठी ओळखले जाणारे हेमेंद्र जोशी यांची मंडल सरचिटणीस पदावर निवड करण्यात आली आहे. गेल्या ३५ वर्षांपासून राजकीय व सामाजिक क्षेत्रात सतत कार्यरत राहून त्यांनी विविध उपक्रम, जनआंदोलने आणि समाजहिताच्या कामांद्वारे विशेष छाप पाडली आहे. स्थानिक समस्यांवर लढा देण्यापासून ते नागरिकांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यापर्यंत त्यांनी कायम सक्रिय भूमिका बजावली आहे. यामुळेच त्यांच्या संघटन कौशल्याचा फायदा पक्षाच्या बळकटीसाठी होणार असल्याचा विश्वास पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार भीमराव (आण्णा) तापकीर तसेच मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी संयुक्तपणे सांगितले की, “हेमेंद्र जोशी यांचा राजकीय व सामाजिक अनुभव, त्यांची कार्यशैली आणि संघटनशक्तीमुळे मंडल तसेच संपूर्ण खडकवासला मतदारसंघात पक्ष अधिक मजबूत होईल. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण झाली आहे.”

यावेळी बोलताना हेमेंद्र जोशी म्हणाले की, “पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास व दिलेली जबाबदारी मी मनापासून स्वीकारतो. पक्षवाढीसाठी, कार्यकर्त्यांच्या बळकटीसाठी तसेच आगामी महानगरपालिका निवडणुकीत पक्ष अधिकाधिक जागा जिंकण्यासाठी निश्चितपणे माझ्याकडून अपेक्षित ते योगदान दिले जाईल,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

- पुलांची उंची वाढवण्याची मागणी – नागेश चव्हाण
- नागेश चव्हाण यांनी जवळगाव हत्तीज परिसरातील पूरस्थितीचा घेतला आढावा



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

अवकाळी पावसामुळे बार्शी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतात पाणी साचल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या गंभीर परिस्थितीचा विचार करून पंचनामे न करता सरसकट मदत जाहीर करावी आणि बार्शी तालुक्याचा ओला दुष्काळात समावेश करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी केली आहे.

चव्हाण यांनी आज सकाळी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन माहिती घेतली व उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्याशी संवाद साधून सविस्तर माहिती दिली. तसेच तहसीलदार एफ.आर. शेख यांच्याशीही चर्चा करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, असे आवाहन केले.

यावेळी त्यांनी नागझरी नदी परिसर, हत्तीज, जवळगाव आणि परिसरातील नदी प्रवाहावरील पुलांची उंची वाढवण्याची आवश्यकता अधोरेखित केली. अवकाळी पावसामुळे पाण्याचा जोर वाढतो व पूल पाण्याखाली जातात, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. शेतकरी तसेच नागरिकांचे हाल होतात.

या सर्व पुलांची उंची तातडीने वाढवावी, अशी ठाम मागणी चव्हाण यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना धीर देताना त्यांनी आश्वासन दिले की या मागणीसाठी स्वतः पाठपुरावा करतील आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सरकार निश्चितपणे यावर सकारात्मक कार्यवाही करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## महिलेला ओपन हार्ट सर्जरीच्या जोखमीतून वाचविले



**पुणे(दै. आरंभ पर्व)**

मणिपाल हॉस्पिटल्स, खराडी, पुणे येथील कार्डिओलॉजिस्ट्सनी गंभीर स्वरूपाचे एऑर्टिक स्टेनोसिस व इतर अनेक उपध्याधी असते एका वर्गीय महिलेवरीत ट्रानाकैथेटर एऑर्टिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेन्ट (TAVOसह बलून असिस्टेड BASILICA ही दुर्तिक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडती रुग्णाला स्यूतपणा, उच्चरक्तदाब, हायपोथायराइझम, COFD आणि DSA हे आजार पूर्वीपासून होते तसेच त्यांना गंभीर स्वरूपाचे व्हॉल्यक्ष स्टेनोसिस असत्याने डिस्पनिया श्वास न पुरणे, हसेच जातीत दुखण्याबा त्रासही होता हृदयाची झडप बदलण्यासाठी ओपन हार्ट व्हॉतृव्ह रिप्लेसमेंट सर्जरी केल्यास अपंगत्य वा मृत्यूबी मोठी शक्यता होती तब्येत बरी होण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेऊन त्यांच्या कुटुंबाने ओपन हार्ट मर्जिकल व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटच्या.

## नऱ्हेतील खड्ड्यांवर तातडीची कार्यवाही; भूपेंद्र मोरे यांच्या मागणीला यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील रस्त्यांची अवस्था पावसामुळे अत्यंत गंभीर झाली होती. दररोजच्या प्रवासात नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत होते. याबाबत सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सातत्याने आवाज उठवून पुणे महानगरपालिकेकडे मागणी केली होती. मोरे यांच्या मागणीची दखल घेत बँक ऑफ महाराष्ट्र ते ओढ्यापर्यंतचा रस्ता उखडून ब्लॉक लावून डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असून पावसाळ्यात होणारा त्रास काही प्रमाणात कमी होणार आहे.



या कार्यवाहीसाठी पुढाकार घेतलेल्या पुणे महानगरपालिकेचे अधिकारी श्री. विजय दाभाडे व सौ. नेहा कोलते यांचे भूपेंद्र मोरे यांनी विशेष आभार मानले आहेत. त्यांनी सांगितले की, "नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही केल्याने जनतेला दिलासा मिळाला आहे."

याचबरोबर भूपेंद्र मोरे यांनी आणखी एक महत्वाची मागणी केली आहे. धायरी–नवले ब्रिज व वडगाव परिसरातील खड्डेही तातडीने बुजवावेत, असे ते म्हणाले. या भागातील नागरिकांना देखील मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

भूपेंद्र मोरे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांना दाद मिळत असून स्थानिक पातळीवर त्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक होत आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### अनसरवाडा गावात उपसरपंचांचा स्वच्छतेचा उपक्रम : आदर्श संदेश

निलंगा तालुका (आरंभ पर्व) : अनसरवाडा गावातील उपसरपंचांनी गावाच्या विकासात वेगळा पायंडा पाडत स्वतः रस्ता स्वच्छतेचे काम हाती घेतले. त्यांच्या या कार्यात तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष राम उसनाळे व ग्रामसेवक सूर्यवंशी साहेब यांनीही उपस्थित राहून सहकार्य केले. गावाचे लोकप्रतिनिधी स्वतः झाडू हातात घेऊन स्वच्छतेचे काम करत असल्याचे दृश्य पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी उपसरपंचांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले असून संपूर्ण गावभर याची चर्चा होत आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने गावातील स्वच्छता आणि विकास या विषयांना गती मिळणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. "नेतेमंडळी फक्त आदेश देत नाहीत, तर स्वतःही कामाला लागतात, हेच खरे नेतृत्व," अशा प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून उमटल्या.या उपक्रमामुळे गावात एक सकारात्मक संदेश पोहोचला असून लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनीच स्वच्छतेत सहभागी व्हावे, अशी भावना व्यक्त होत आहे.




### महिलाना साडी व खाऊ वाटप कार्यक्रम संपन्न!!

- खडकवासला येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा उपक्रम

खडकवासला (आरंभ पर्व) : कै. देवराम देडगे फाऊंडेशन आणि भारतीय जनता पार्टी खडकवासला मंडल यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत "साडी व खाऊ वाटप" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा सेवा सप्ताह मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड व जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांनी केले. या कार्यक्रमाला प्रदेश सचिव भाजप ओबीसी मोर्चा दत्ताभाऊ कोल्हे, शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, नितीन गोरे, विधानसभा उपाध्यक्ष अमोल ठाकर, अजय मते, ऋषी मते, बाळासाहेब मते, गणेश हगवने तसेच देडगे परिवार उपस्थित होता. यावेळी शहर उपाध्यक्ष सचिन मोरे यांनी रमेश गायकवाड यांनी राबवलेल्या उपक्रमाचे स्वागत केले. भविष्यातही असे उपक्रम राबवून सामाजिक चळवळीस हातभार लावावा असे आवाहन केले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमाची सर्वत्र चांगलीच चर्चा झाली.

### भक्तिमय गाणं YouTube वर



खडकवासला (आरंभ पर्व) : “मेरी झाली भर देना भोलेनाथ” हे भक्तिमय गाणं आता लवकरच YouTube वर रसिकांच्या भेटीला येत आहे. महादेवाच्या चरणी अर्पण केलेल्या या सुरेल गीतातून भक्तीभावना आणि अध्यात्मिक आनंदाची अनोखी मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. हे गाणं सादर करत आहे महादेव प्रोडक्शन, ज्यांच्या निर्मितीमुळे आजवर अनेक भक्तिगीते रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.












# अभिनव भारत चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे देशभर सेवा पंधरवडा अभियान राबवले जात आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून धायरी, वडगाव, नऱ्हे व आंबेगाव बुद्रुक परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी अभिनव भारत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला असून स्पर्धेत विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

स्पर्धा विविध गटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

अ गट (१ ली ते ४ थी) : स्वच्छता अभियान, छत्रपती शिवाजी महाराज, माझी पाण्याची बोट.

ब गट (५ वी ते ८ वी) : नवा भारत – बदलता भारत (विकसित), छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक प्रसंग, नवे किनाऱ्याचे मंदिर.



क गट (९ वी ते १२ वी) : माझे बदलते पुणे शहर, छत्रपती संभाजी महाराज (व्यक्तिचित्र), ऑपरेशन सिंधू.

विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी आपली नोंदणी करून दिलेल्या विषयांवर चित्र सादर करायचे आहे. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र परीक्षक मंडळ काम पाहणार आहे.

स्पर्धेत विजेत्यांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

प्रथम क्रमांक : सायकल व रोख ₹१०,०००/-

द्वितीय क्रमांक : DOMS रंग साहित्य संच व रोख ₹७,५००/-

तृतीय क्रमांक : शालेय बॅग व रोख ₹५,०००/-

नगरसेवक हरिदास चरवड यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्यात देशप्रेमाची भावना रुजवणे व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यप्रेरणेने समाजासाठी नवे विचार रुजवणे हेच या उपक्रमामागचे उद्दिष्ट आहे."

धायरी मंडळ आयोजित या अभिनव चित्रकला स्पर्धेला पालक व नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कार्यक्रम रद्द करून पूरग्रस्तांना मदतीचा हात

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील जवळगाव नं. २ येथे तुळजाभवानी सामाजिक व बहुउद्देशीय संस्थेतर्फे नवरात्र महोत्सव २०२५ साजरा करण्यात येत आहे. यंदा होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तो कार्यक्रम रद्द करून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष नागेश चव्हाण यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील महापुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतं, घरं, जनावरे यांचे मोठे नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेतर्फे ग्रामस्थांना एकत्र आणून पूरग्रस्तांसाठी मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. या महोत्सवात देवीच्या गाण्यांचा व होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मात्र हा कार्यक्रम रद्द करून साधनसामग्री पूरग्रस्तांना



- **नागेश चव्हाण यांचा सामाजिक कार्यास हातभार!**

मदत करण्यासाठी वापरली जाणार आहेत. धान्य, कपडे, ब्लँकेट्स व इतर जीवनावश्यक साहित्य संकलन करून पूरग्रस्तांना पोहोचवले जाणार आहे. "या संकटकाळात सामाजिक एकतेने पुढे येणे हीच खरी देवीची आराधना आहे. पूरग्रस्त बांधवांच्या आधारासाठी आपण सारे मिळून पुढाकार घ्यावा," असे आवाहन जिल्हा सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोलापूर जिल्हा नागेश् चव्हाण यांनी केले आहे.

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**राजगुरूनगर(दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाली. संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. विषयपत्रिकेनुसार सभासदांनी चर्चा केली.

नवीन विस्तारित इमारत बांधकाम, प्रवेश घेतलेल्या व परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

या सभेला संबोधित करताना आमदार बाबाजी काळे यांनी तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारून संस्थेने खरेदी केलेल्या जागेत नवीन महाविद्यालयाला प्रशस्त इमारत बांधून देण्याचे आश्वासन दिले.

# पंतप्रधान यांच्या जन्मदिनानिमित्त आर्वी येथे विविध स्पर्धांचे आयोजन

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या ७५ व्या जन्मदिनानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांचा एक भाग म्हणून आर्वी येथील ऑक्सफर्ड स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे "मी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलतोय" या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. हा उपक्रम भाजपा आमदार भिमराव आण्णा तापकीर, भाजपा पुणे जिल्हा अध्यक्ष (दक्षिण ग्रामीण विभाग) शेखरजी वढणे व भाजपा पुणे जिल्हा अध्यक्ष (युवा मोर्चा, दक्षिण ग्रामीण विभाग) वैभवजी सोलणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. मा. सौ. रसिका गणेश सणस (भाजपा युवा मोर्चा, पुणे जिल्हा) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमास परीक्षक म्हणून मा. श्री. दिपक रजपूत (पुणे जिल्हा अध्यक्ष, पदवीधर आघाडी) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वक्तृत्वकला, आत्मविश्वास व राष्ट्रसेवेची जाणीव यांवर भर दिला. यासोबतच जिल्हा परिषद शाळा, आर्वी तसेच जिल्हा परिषद शाळा, तानाजीनगर येथे "मी पंतप्रधान झालो तर" या विषयावर



वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि सुलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाला भाजपा खडकवासला ग्रामीण मंडळ अध्यक्ष नवनाथ तागुंदे, युवा मोर्चा अध्यक्ष शरद जावळकर, युवा मोर्चा सरचिटणीस कृष्णा अवसरे, आर्वी-तानाजीनगर सरपंच मा. श्री. सागर नवघणे, मा. श्री. पांडुरंग आबा सणस, मा. श्री. जीवन वाल्हळ, मा. श्री. राजेंद्र दिघे, मा. श्री. भाऊसाहेब अनारसे, मा. श्री. संदीप घाटे तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मा. श्री. उदय पुरंदरे उपस्थित होते.

# धायरीत सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत नेत्र तपासणी व 'स्वस्थ नारी–सशक्त परिवार' कार्यक्रम

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाकडून देशभर सेवा पंधरवडा उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांतर्गत धायरी जाधव नगर येथे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रोहिणी राहणे यांच्या पुढाकाराने जानकी प्रतिष्ठान व दूधभाते नेत्रालय यांच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.




या शिबिरात महिला, लहान मुले-मुली व स्थानिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. मोफत सल्लामसलत व मार्गदर्शनामुळे शेकडो नागरिकांना फायदा झाला. पालकांनी मुलांच्या तपासणीबद्दल समाधान व्यक्त केले. "डोळे ही देवाने दिलेली अनमोल देणगी आहे, त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे," असे रोहिणी राहणे म्हणाल्या. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांचे राष्ट्रकार्य अविरत सुरू राहावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, धायरी रायकर मळा येथे "स्वस्थ नारी – सशक्त परिवार" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आरोग्याशी निगडीत असल्याने प्रत्येक महिलेला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी हा महायुती सरकारचा संकल्प असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला नयन चव्हाण (अनुलोम संस्था), सुरया शेख (किलबिल शाळा प्राचार्या), छाया भगत (सूर्योदय वृधाश्रम संचालिका) आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच तृप्ती बर्डे व तेजस्विनी शिरोडकर यांचेही सहकार्य लाभले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून, समाजहितासाठी राबवलेले कार्य सर्वांनी स्वागतार्ह असल्याचे मत व्यक्त केले.




## थोडक्यात पण महत्वाचे




### अमली पदार्थांविरोधातील लढाई आता मॅरेथॉनमधून जागतिक पातळीवर

पुणे (आरंभ पर्व) : अंमली पदार्थांविरोधात एकत्रितपणे लढा देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून यंदाची बहुचर्चित 'आपलं पुणे' मॅरेथॉन जागतिक स्वरूपात झळकणार आहे. पुण्याच्या अद्वितीय मॅरेथॉन परंपरेला पुढे नेण्यासाठी 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन २०२५' ही स्पर्धा १२ ऑक्टोबर रोजी रविवारी पहाटे चारपासून (प्रत्येक गटानुसार) श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथून सुरू होणार आहे. या मॅरेथॉनमध्ये सुमारे १०,००० धावपटूंचा सहभाग अपेक्षित आहे. त्यामध्ये नामवंत आंतरराष्ट्रीय धावपटू, देशभरातील धावपटू, रनिंग ग्रुप, कॉर्पोरेट संघ, लष्कर, पोलिस कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचा आणि फिटनेसप्रेमींचा समावेश आहे. ही स्पर्धा लोहा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आली असून, पंचशील रिॲलिटी हे मुख्य प्रायोजक आहेत. यंदा विजेत्यांना एकूण १९.५३ लाख रुपयांची पारितोषिक देण्यात येणार आहेत. ही पारितोषिके नामांकित खेळाडूंना; तसेच विविध वयोगटातील विजेत्यांना देण्यात येणार आहेत.

### शुभम कुंभारची चमकदार कामगिरी



लातूर (आरंभ पर्व) : लातूर जिल्ह्यातील होतकरू विद्यार्थी शुभम दिगंबर कुंभार याने आपल्या चिकाटी, परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर एम.बी.टी.ई. या परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. दहापैकी तब्बल नऊ विषय उत्तीर्ण करून त्याने लातूर जिल्ह्याचा मान उंचावला असून, या उज्वल कामगिरीबद्दल सर्वत्र त्याचे मनःपूर्वक कौतुक होत आहे. शुभमच्या या यशामुळे त्याच्या कुटुंबीयांसह शिक्षक, मित्रपरिवार तसेच लातूरकर अभिमानाने डोळे भरून कौतुक करत आहेत. अभ्यासू वृत्ती, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनत हेच यशाचे खरे गमक असल्याचे त्याच्या कामगिरीतून दिसून आले आहे. सध्या शुभम एआयएमएल (Artificial Intelligence & Machine Learning) थर्ड इयर मध्ये शिक्षण घेत आहे. भविष्यात तो आयटी क्षेत्रात उत्तुंग शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त होत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.लातूरच्या तरुणाईसाठी शुभम कुंभारची ही यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे.

### खडकवासला धरणातील विसर्ग १० हजार क्युसेकपर्यंत वाढणार

खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला धरणातील पाण्याची आवक वाढत असल्याने शनिवारी हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढून १० हजार क्युसेकपर्यंत पोहोचण्याची शक्यता मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्षाने वर्तवली आहे. आज शनिवारी सकाळी धरणातून सोडण्यात येणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात आली. सकाळी १० वाजता धरणातून सुरू असलेला २१०५ क्युसेक विसर्ग वाढवून ३७८९ क्युसेक करण्यात आला. सध्या पानशेत आणि वरसगाव धरणांतून प्रत्येकी ४५० क्युसेक पाणी सोडले जात आहे.

# पुणे महानगरपालिका निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष

## सर्वच पक्षांमध्ये उमेदवारीवरून रस्सीखेच : काही अनपेक्षित पक्षांतरेही शक्य; बंडखोरी कशी रोखणार याकडे असणार वरिष्ठांचे लक्ष

**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**

**(दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीची धामधूम सुरू झाली असून सर्वच पक्षांनी आपली मोर्चेबांधणी वेगात केली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निकालावरून पाहता ही निवडणूक भाजपसाठी तुलनेने सोपी ठरू शकेल, असा अंदाज व्यक्त केला जात असला तरी महानगरपालिका ही निवडणूक नेहमीच स्थानिक प्रश्नांवर आधारित असते. त्यामुळे विधानसभेच्या परिणामाचा कितपत प्रभाव पडतो, याकडे राजकीय वर्तुळासह मतदारांचेही लक्ष लागले आहे.

निवडणुका जवळपास मोठ्या कालावधीनंतर होत असल्याने इच्छुक उमेदवारांची संख्या प्रचंड वाढली आहे. "आता नाही तर कधीच नाही" या भावनेतून अनेक नेते व कार्यकर्ते जोरात तयारीला लागले आहेत. मात्र, इच्छुकांची ही वाढती संख्या पक्षांतर्गत तणाव निर्माण करणारी ठरू शकते. तिकिट न मिळाल्यास अनपेक्षितपणे पक्षांतर घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

काही इच्छुकांनी पॅनेलच्या तयारीसह प्रचारयंत्रणा आधीच सज्ज केली असून, त्यांनी बॅनरबाजी, जनसंपर्क, बैठकांचे आयोजन यांना वेग दिला आहे.

भाजप, शिवसेना (शिंदे-उद्धव गट), राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), काँग्रेस, मनसे आणि आम आदमी पार्टी असे सर्वच पक्ष उमेदवारीसाठी जोरदार तयारी करत आहेत. प्रस्थापित नगरसेवकांना धक्के बसण्याची शक्यता असून, पक्ष तिकीट वाटपात कोणाला प्राधान्य देतो याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. महापालिकेतील सत्तासमीकरण बदलल्यास शहराच्या विकास कामांवर त्याचा थेट परिणाम होणार असल्याने नागरिकांचाही सहभाग व लक्ष या वेळी जास्त आहे.

वर्षानुवर्षे तयारी करणाऱ्या इच्छुकांना जर अंतिम क्षणी "शांत बसा" असे पक्ष नेतृत्वाने सांगितले, तर ते खरंच शांत बसतील का, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे असंतुष्ट नेते इतर पक्षांचा मार्ग धरू शकतात आणि काही जणांना अनपेक्षितरीत्या उमेदवारी मिळू शकते. शिवाय या वेळेस तरुण व नव्या चेहऱ्यांना संधी मिळावी, अशी मागणी होत असल्याने पक्ष नेतृत्वाकडे समीकरण जपण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.



पक्षांतरांची ही शक्यता, नवे चेहरे, तरुणाईचा उत्साह आणि जुन्या नेत्यांची चुरस यामुळे पुणे महापालिका निवडणूक रंगतदार होणार हे निश्चित झाले आहे. आगामी आठवड्यांत राजकीय धुरळा अधिकच उडणार असून, कोणाचा गोट मजबूत होतो आणि कोणाला गळती लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संचेती रुग्णालय आता स्ट्रोक रेडी सेंटर

पुणे (आरंभ पर्व) : (महेश वरवटे (लातूरकर) : देशातील आघाडीचे अस्थिरोग व पुनर्वसन क्षेत्रातील तज्ज्ञ असलेले संचेती रुग्णालय, पुणे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर के ले की, रुग्णालयाला आता "स्ट्रोक रेडी सेंटर" म्हणून मान्यता मिळाली आहे. ही घोषणा आपत्कालीन व न्यूरोलॉजी के अरमधील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या यशामुळे संचेती रुग्णालयाचे वेळेवर, तज्ज्ञ व सर्वसमावेशक स्ट्रोक उपचार देण्याचे वचन अधोरेखित झाले आहे, ज्यामुळे रुग्णांना योग्य वेळी अत्यावश्यक उपचार मिळणार आहेत. ही घोषणा संचेती रुग्णालयाचे चेअरमन डॉ. पराग संचेती, संचालक सौ. रूपल संचेती (मार्केटिंग व कम्युनिकेशन विभाग), रुग्णालयप्रमुख डॉ. यशवंत शिवण्णा तसेच न्यूरोसायन्सेस विभाग यांच्या उपस्थितीत करण्यात आली. स्ट्रोक हा एक आपत्कालीन वैद्यकीय प्रसंग आहे ज्यामध्ये प्रत्येक सेकं द महत्त्वाचा असतो. तो जागतिक स्तरावर मृत्यूचे दसरे व अपंगत्वाचे तिसरे मोठे कारण मानले जाते (वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायझेशन, २०२३). जर स्ट्रोक रुग्णाचा उपचार पहिल्या ६० मिनिटांत—"गोल्डन अवर" मध्ये—झाला, तर त्याच्या जगण्याची संधी मोठ्या प्रमाणात वाढते व दीर्घकालीन अपंगत्व कमी होते. संचेती रुग्णालयाने हा पुढाकार एंजेल्स इनिशिएटिव्ह च्या अपूर्व सहकार्याने उचलला आहे. या उपक्रमांतर्गत वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायझेशन मान्यताप्राप्त पॅरामीटर्सनुसार ४० हून अधिक क्लिनिकल स्टाफला प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तज्ज्ञ न्यूरोलॉजिस्टची सेवा, अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानव उच्चस्तरीय उपचार सुविधा यांच्या माध्यमातून संचेती रुग्णालय आता रुग्णांना जलद निदान, तत्काळ उपचार व उच्च दर्जाचे पुनर्वसन उपलब्ध करून देईल. डॉ. पराग के . संचेती, चेअरमन, संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स यांनी सांगितले.

### नवरात्रीचे औचित्य साधून महिलांसाठी खास "होम मिनिस्टर" कार्यक्रम



पुणे (आरंभ पर्व) : नवरात्रीच्या सणानिमित्त नऱ्हे, धायरी व वडगाव परिसरातील महिलांसाठी खास "होम मिनिस्टर" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला भगिनींचा आवडता ठरलेला हा खेळ यंदा थेट सोसायटीपर्यंत नेण्यात येणार आहे. खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष भूपेंद्र मोरे यांच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात महिला सहभागींसाठी पैठणी साडी, आकर्षक नथ आणि चांदीचे नाणे अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. याशिवाय पाच महिलांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जाणार आहेत. याशिवाय सहभागी सर्व महिलांना एक विशेष भेटवस्तू देण्यात येणार आहे.महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. "सोसायटी तुमची, कार्यक्रम आमचा" या ब्रीदवाक्याखाली हा उपक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध निवेदक राज शिनारे करणार आहेत.







# वारजेकरांसाठी दिलासा – वारजे ते वनाज मेट्रो फीडर बस सेवा सुरू

## माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी केली होती मागणी



### सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांनी व्यक्त केला आनंद

**"आता आमच्या दैनंदिन प्रवासाचा त्रास कमी झाला आहे. वेळ, खर्च आणि ऊर्जा वाचणार आहे. मेट्रोचा लाभ खऱ्या अर्थाने घेता येणार आहे, सचिन दोडके यांचे आभार" अशा भावना वारजेकरांनी व्यक्त केल्या. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थी वर्गालाही ही सेवा मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरणार असल्याचे दिसून येत आहे. या फीडर बससेवेच्या माध्यमातून मेट्रो प्रवासाला नवी गती मिळणार असून, खासगी वाहनांवरचा ताण कमी होईल. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषणावरही काही प्रमाणात नियंत्रण मिळेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.**



**वारजेकरांच्या दीर्घकाळच्या मागणीला अखेर यश आले असून, सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण निवेदन दिले होते. अखेर सततच्या पाठपुराव्यामुळे सुरू झालेली ही फीडर बस सेवा वारजेकरांसाठी खऱ्या अर्थाने दिलासा ठरणार आहे.** **- सचिन दोडके, माजी नगरसेवक पुणे मनपा**

**वारजे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघातील वारजे आणि परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची दिलासादायक बातमी! आता वारजेकरांना मेट्रो प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे. अखेर वारजे ते वनाज मेट्रो स्टेशनदरम्यान पीएमपीएमएलची मेट्रो फीडर बस सेवा अधिकृतपणे सुरू झाली आहे.

वारजे व परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. हजारो नागरिक दररोज पुण्यातील विविध भागात प्रवास करतात. यातील बहुतांश लोक मेट्रोचा वापर करू इच्छित होते; मात्र वनाज मेट्रो स्टेशनपर्यंत पोहोचण्यासाठी कोणतीही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्याने नागरिकांना रिक्षा व खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे मेट्रो प्रवास म्हणावा तितका सोयीस्कर ठरत नव्हता.

या पार्श्वभूमीवर आदरणीय संसदरत्न खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी पीएमपीएमएल व्यवस्थापकांकडे निवेदन सादर केले. वारजे परिसरातील हिल व्ह्यू सोसायटी, शोभापुराण सोसायटी, शिफ्ला चौक, अतुलनगर, रूणवाल सोसायटी, आदित्य गार्डन सिटी, वारजे हायवे चौक, पॉप्युलर नगर, करण ग्रीन या मार्गावर गोलाकार फीडर बससेवा सुरू करण्याची मागणी यामध्ये करण्यात आली होती.

सचिन दोडके यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आणि पीएमपीएमएलने वारजे–वनाज मेट्रो फीडर बस सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतली.ही सेवा प्रत्यक्षात सुरू झाली असून, वारजेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# पूरग्रस्तांना सरसकट मदत द्या

VJTech Academy चे संचालक प्रा. विशाल लक्ष्मण जाधव यांची सरकारकडे मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
राज्यातील अनेक भाग पूरग्रस्त झाल्यामुळे शेतकऱ्यांचे व सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीत कोणतेही निकष न लावता सरसकट एकरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी ठाम मागणी VJTech Academy चे संचालक प्राध्यापक विशाल लक्ष्मण जाधव यांनी महाराष्ट्र शासनाकडे केली आहे. पूरामुळे शेतजमिनीतील उभे पीक वाहून गेले, जनावरांचा चारा संपला तसेच घरे उद्ध्वस्त होऊन शेकडो कुटुंबे संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने निर्णय घेऊन लोकांना दिलासा देणे आवश्यक असल्याचे जाधव यांनी सांगितले.

"राजकारण बाजूला ठेवून गरजू व गरीब जनतेची सोय करा. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळणे हीच खरी गरज आहे," असे आवाहन त्यांनी केले.

पूरग्रस्त जनतेला तातडीने व पारदर्शकपणे मदत पोहोचवावी, अशी अपेक्षा स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# अमली पदार्थांविरोधात पुण्यात 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन २०२५' चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
अंमली पदार्थांविरोधात एकत्रितपणे लढा देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून यंदाची बहुचर्चित 'आपलं पुणे' मॅरेथॉन जागतिक स्वरूपात झळकणार आहे. पुण्याच्या अद्वितीय मॅरेथॉन परंपरेला पुढे नेण्यासाठी 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन २०२५' ही स्पर्धा १२ ऑक्टोबर रोजी रविवारी पहाटे चारपासून (प्रत्येक गटानुसार) श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथून सुरू होणार आहे.




या मॅरेथॉनमध्ये सुमारे १०,००० धावपटूंचा सहभाग अपेक्षित आहे. त्यामध्ये नामवंत आंतरराष्ट्रीय धावपटू, देशभरातील धावपटू, रनिंग ग्रुप, कॉर्पोरेट संघ, लष्कर, पोलिस कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचा आणि फिटनेसप्रेमींचा समावेश आहे. ही स्पर्धा लोहा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आली असून, पंचशील रियल्टी हे मुख्य प्रायोजक आहेत. यंदा विजेत्यांना एकूण १९.५३ लाख रुपयांची पारितोषिक देण्यात येणार आहेत. ही पारितोषिके नामांकित खेळाडूंना; तसेच विविध वयोगटातील विजेत्यांना देण्यात येणार आहेत. पुण्यातील पीवायसी हिंदू जिमखान्याच्या आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली,यावेळी लोहा फाउंडेशन'चे सचिव आणि आयोजक रवींद्र वाणी,लोहा फाउंडेशनच्या अध्यक्षा संजना लाल,सहाय्यक पोलिस आयुक्त,पुणे श्री.साईनाथ ठोंबरे, आयर्न मॅन डॉ. कौस्तुभ राडकर उपस्थित होते.

'Say No to Drugs, Say Yes to Run' या परंपरेला पुढे घेऊन जाऊन 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन' समाजात अमली पदार्थमुक्त जीवनशैलीचा प्रसार करणार असून, आरोग्य, फिटनेस आणि सकारात्मकतेची संस्कृती रुजवण्याचा संदेश देणार आहे, असे संयोजकांनी नमूद केले.

# सर्व कायदेशीर गोष्टींचा विचार करुन यशवंतची जमीन खरेदी करावी

- **सर्व कायदेशीर गोष्टींचा विचार करुन यशवंतची जमीन खरेदी करावी माजी सभापती दिलीप काळभोर व संचालक प्रशांत काळभोर, रोहिदास उंद्रे, रामकृष्ण सातव यांनी साखर आयुक्तांना दिले पत्रक**



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याची जमीन खरेदी करताना सर्व गोष्टींचा विचार करुन जमीन खरेदी करावी असे पत्रक पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप काळभोर व संचालक प्रशांत काळभोर,रोहिदास उंद्रे ,रामकृष्ण सातव यांनी साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य , पणन संचालक महाराष्ट्र राज्य व प्रादेशिक सहसंचालक साखर पुणे यांना दिले असून त्यामध्ये नमूद केले आहे की भविष्यामध्ये ही जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करताना कोणतीही कायदेशिर अथवा आर्थिक अडचण निर्माण होवून सदरचा व्यवहार अर्धवट अडकून पडू नये व दोन्हीही संस्थांचे आर्थिक अथवा इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान होवू नये यासाठी बाजार समितीकडे सदर जमीन खरेदीसाठी आवश्यक निधी रू. २९९ कोटी एकरकमी उपलब्ध नाही. त्यामुळे बाजार समितीकडे सध्या शिल्लक असलेली रक्कम, उर्वरित रक्कम उभारणेकामी करावयाची उपाययोजना , नियोजन, शिल्लक निधी संपल्यानंतर बाजार समितीची चालु असलेली विकास कामे तसेच दैनंदिन कामकाज, आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च, विकास निधी व कारखान्याचे उर्वरित रक्कम देणेसाठी आवश्यक निधी कसा उभा करणार याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे.

तसेच यशवंत सहकारी साखर कारखान्याला जमीन विक्रीतुन मिळणाऱ्या रक्कमेतुन बँकांची देणी, शासकीय देणी, सभासदांची थकीत देणी, कामगारांची देणी देण्यासाठी आवश्यक असणारा निधी तसेच तद्नंतर कारखाना सुरू करून ऊस गाळप सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची पुर्तता बाजार समितीमार्फत निर्धारित वेळेत न झाल्यास कारखान्याचे व सभासदांचे खुप मोठे नुकसान होईल व परिणामी दोन्ही संस्था आर्थिक दृष्ट्या अडचणीत येतील.

तरी याबाबत प्रथमतः बाजार समितीने वरील सर्व आर्थिक व कायदेशिर मुद्यांबाबत पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शन मागविणेत यावे व नंतर पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या समवेत दोन्ही संस्थांचे संचालक मंडळाची संयुक्त बैठक आयोजित करून सदर बैठकीमध्ये वरील सर्व मुद्दे तसेच जमीन खरेदी विक्री संदर्भात नियम अटी तयार करणे, निधी उभारणे बाबत नियोजन झाल्यानंतर जमीन खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. तोपर्यंत बाजार समितीने या विषयाबाबत कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.

राज्य शासनाने यशवंत सहकारी साखर कारखान्यास जमीन विक्री करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयाची अधिकृत प्रत अं. पां. शिंगाडे, उपसचिव, महाराष्ट्र शासन यांनी कार्यकारी संचालक, यशवंत सहकारी साखर कारखाना लि. थेऊर यांना दिलेली आहे. परंतु सदर जमीन बाजार समितीला खरेदी करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही .असे शासन निर्णयावरून दिसते. बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने बाजार समितीस सदर जमीन खरेदीस मान्यता दिलेबाबतचे कोणत्याही प्रकारचे अधिकृत पत्र ,आदेश शासनाकडून अथवा पणन संचालक यांचेकडून बाजार समितीला अद्याप प्राप्त झालेले नाहीत. शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रत संबंधित वेगवेगळ्या १४ विभागांना व अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे कुठेही नाव नाही.

# एकनाथ शिंदे यांनी आदेश देऊनही प्रशासन ठप्प

## महेश वरवटे (लातूरकर)




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
२०२२ मध्ये वीणा वर्ल्ड टूर अँड ट्रॅव्हल्सच्या मॅनेजर च्या चुकीच्या निर्णयामुळे लेह येथे आपल्या पतीला गमावलेल्या श्रीमती तारामती शिवाजी गांगर्डे यांचे अश्रू कोण पुसणार असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. दोन वेळेस उपमुख्यमंत्र्यानी लेखी व तोंडी आणि मोबाईल द्वारे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना आदेश देऊनही या महिलेला अजूनही न्याय मिळाला नसल्याचे त्यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी कि, वीणा वर्ल्ड ह्या प्रतिष्टीत कंपनीची जाहिरात पाहून त्यांनी आपले दिवंगत पती शिवाजी गांगर्डे यांच्यासह लेह लडाख येथे जाण्याचा निर्णय घेतला प्रतिष्टीत टूर कंपनी असल्याने ते आपली काळजी घेतील आणि व्यवस्थित परत आणतील अशी अपेक्षा बाळगून गांगर्डे दापंत्याने २१ मे २०२२ रोजी लेह लडाख ट्रिप चे पैसे भरले.सगळे छान सुरु होते परंतु लेह येथे पोहताच पती शिवाजी गांगर्डे यांना खोकल्याचा त्रास सुरु झाला. याबाबत त्यांनी टूर मॅनेजर धीरज चौधरी यांच्याशी संपर्क केला परंतु येथील हवामान असेच असते म्हणून त्यांनी वेळ मारून नेली. यानंतर त्यांची तब्येत थोडी बिघडत असल्याची दिसताच त्यांनी पुन्हा विना वर्ल्डच्या टूर मॅनेजरशी संपर्क करून जवळील हॉस्पिटल मध्ये नेण्यास सांगितले. परंतु या मॅनेजर ने हॉस्पिटल मध्ये न नेता ट्रिप मधील दातांच्या डॉक्टर कडून कुठलीतरी गोळी घेऊन ती त्यांना दिली. यानंतर माझे पती रुम मध्ये झोपी गेले. परंतु त्यांचा झोपेतच मृत्यू झाला. ट्रिप मधील व्यक्तीचा मृत्यू होऊन सुद्धा या मॅनेजर ने पुढील ट्रिप सुरु ठेवून मला माझ्या पतीच्या मृतदेहाला एकटे सोडून ते गेले. यावेळी लेह पोलिसांनी मॅनेजरशी संपर्क करून तुम्हाला काही माणुसकी आहे कि नाही आणि पोलिसी भाषेत सांगितल्याने त्याने तेथील एक अनोळखी व्यक्ती सोबत दिला व इतर लोकांना घेऊन पुढील लडाख ट्रिप ला घेऊन गेला. यानंतर या मॅनेजर ने लोकल पोलिसांशी काहीतरी बोलून दाताच्या डॉक्टर ने दिलेली औषधे माझ्याकडून काढून घेतली. यानंतर माझ्या पतीचे पोस्ट मार्टम केले गेले. मला त्या मॅनेजर सांगितले उद्या सकाळी सात वाजता तुमचे विमान असून तुम्ही चार वाजता विमानतळावर पोहोचा. सकाळी दहा वाजल्यानंतर सुद्धा विमान बाबत माहिती न मिळाल्याने त्यांनी विमानतळ अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांचे विमानाचे तिकीटच बुक नसल्याचे

सांगितले यावेळी त्यांनी तेथील अधिकाऱ्याना विनंती करून एक तिकीट मिळवून पुण्याला आल्या. अशा रीतीने दोन दिवस मृतदेहाची अवहेलना या विना टूर च्या मॅनेजर मुळे झाली. आपल्या पतीचे सर्व विधी सोपस्कार पार पाडून त्यांनी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता त्याची दाखल घेतली नाही म्हणून त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क करून त्यांच्या अर्जावर त्वरित कारवाई करण्याचे शिंदे यांनी लिहून दिले असता भोसरी पोलीस ठाण्यात २० जून २०२३ रोजी गुन्हा दाखल झाला परंतु आज पर्यंत यावर काहीच कारवाई झाली नाही. यानंतर या महिलेने पुन्हा एकनाथ षीने यांच्या महिला दिन कार्यक्रमात याबाबत दाद मागितली असता त्यांनी त्वरित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क करून कारवाई करण्याचे सांगितले परंतु यानंतर सुद्धा प्रशासन ठप्प असून याबाबत या महिलेला न्याय कधी मिळणार असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. याबाबत या महिलेने स्थानिक आमदार महिला आयोग, पंतप्रधान कार्यालय, गृहमंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय येथे वारंवार विनंती अर्ज देऊनही काही कारवाई झालेली नाही यामुळे त्यांनी मला जर न्याय मिळाला नाही तर मी आत्मदहन करणार असल्याचा इशारा देखील दिला आहे. याबाबत आम्ही विना वर्ल्ड चे मॅनेजर धीरज चौधरी यांना संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही तसेच भोसरी कार्यालयात देखील फोन केला असता त्यांनी तो उचलल नाही.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.